ईश्वर टी ॲण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव
सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी

प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३३१ वा ● सोमवार, ता. १६ जून २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



# इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला

## एनडीआरएफचे युद्धपातळीवर बचावकार्य

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील जुना पूल कोसळून मोठी दुर्घटना घडली आहे. या दुर्घटनेत ६ जणांचा मृत्यू झाला असून २० ते २५ जण नदीच्या प्रवाहात वाहून गेले असावेत, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. दुर्घटनेची माहिती मिळताच एनडीआरएफच्या पथकासह प्रशासन, पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी बचाव व मदतकार्य सुरू केले आहे. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदीच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली होती. रविवारी सुट्टी असल्याने कुंडमळा या पर्यटनस्थळी अनेक पर्यटक आले होते. याच दरम्यान, जुना पूल कोसळल्याने ही दुर्घटना घडली. स्थानिक आमदार सुनील शेळके यांनी 'टीव्ही९ मराठी' या वृत्तवाहिनीला दिलेल्या माहितीनुसार, ६ जणांचा मृत्यू झाला असून बरेच पर्यटक अजूनही बेपत्ता आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबाबत दुःख व्यक्त करताना सांगितले, ''इंदोरी येथे इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेली दुर्घटना हृदयद्रावक आहे. मृतांना श्रद्धांजली अर्पण करतो. मी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व पोलिस अधिकाऱ्यांशी सतत संपर्कात आहे.'' त्यांनी पुढे सांगितले की, एनडीआरएफला घटनास्थळी पाचारण करण्यात आले असून ६ जणांना वाचविण्यात यश आले आहे. ३२ जण जखमी असून त्यातील ६ गंभीर आहेत. सर्व यंत्रणांना अलर्ट मोडवर ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही या घटनेबाबत तीव्र दुःख व्यक्त केले. ''ही दुर्घटना अत्यंत वेदनादायी असून, प्रशासनाने तात्काळ मदत व बचावकार्य सुरू केले आहे. जखमींना आवश्यक वैद्यकीय उपचार देण्यात येत आहेत. पुलाची अवस्था जीर्ण असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असून, दुर्घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल,'' असे त्यांनी स्पष्ट केले. आमदार सुनील शेळके यांनी सांगितले, ''हा फॅब्रिकेटेड पूल होता. काही जणांनी टू-व्हीलरसह पूल पार करण्याचा प्रयत्न केला आणि ओव्हरलोड झाल्याने पूल कोसळला. सध्या बचावकार्य सुरू असून रुग्णवाहिका आणि एनडीआरएफची टीम घटनास्थळी दाखल आहे.''त्यांनी पुढे सांगितले की, ''घटनास्थळी काही ठिकाणी खडकाळ सखल भाग असल्यामुळे वाहून गेलेल्यांपैकी किती जण अडकले आहेत, याची अचूक माहिती अद्याप मिळालेली नाही.''राज्य शासनाने आपत्तीग्रस्त नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभं राहण्याची ग्वाही दिली आहे. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीवर विश्वास ठेवावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. मंत्री गिरीश महाजन यांनी मृतांच्या नातेवाईकांना ५ लाखांची मदत दिली जाणार असल्याची घोषणा केली.

# विद्यार्थ्यांचे परदेशी शिक्षणाचे स्वप्न आता भारतातच पूर्ण होणार - मुख्यमंत्री

## पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांना आशयपत्र प्रदान



**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय विद्यार्थ्यांना आता परदेशात जाण्याची गरज भासणार नाही, कारण पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठे महाराष्ट्रात शिक्षणासाठी येत असून नवी मुंबई व मुंबई परिसरात त्यांचे कॅम्पस स्थापन होणार आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. 'मुंबई रायझिंग: क्रिएटिंग अ इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी' या कार्यक्रमात पाच परदेशी विद्यापीठांना आशयपत्र (LOI) प्रदान करण्यात आले. या वेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, तसेच अमेरिका, यूके, इटली आणि ऑस्ट्रेलियाचे शिष्टमंडळ उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ''युनिव्हर्सिटी ऑफ ॲबर्डीन (यूके), युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क (यूके), वेस्टर्न ऑस्ट्रेलिया युनिव्हर्सिटी (ऑस्ट्रेलिया), इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (अमेरिका), आणि इस्टिटुटो युरोपियो डी डिझाईन (इटली) ही नामवंत विद्यापीठे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात शैक्षणिक संकुल उभारणार आहेत.'' याठिकाणी मेडिसिटी, स्पोर्ट्स सिटी आणि इनोव्हेशन सिटी विकसित

### नवी मुंबईत शैक्षणिक हब उभारण्याची घोषणा

करण्याचाही सरकारचा मानस आहे. केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटले, ''या विद्यापीठांमुळे भारतातच परदेशी दर्जाचे शिक्षण कमी खर्चात उपलब्ध होईल. हे धोरण 'विकसित भारत २०४७' संकल्पनेला बळकटी देणारे ठरेल.'' विद्यापीठांची वैशिष्ट्ये: युनिव्हर्सिटी ऑफ ॲबर्डीन (UK) स्कॉटलंडमधील जुने IIT व AIIMS यांच्यासोबत भागीदारी. यॉर्क युनिव्हर्सिटी (UK) संशोधन व AI सायबर सुरक्षा, सर्जनशील उद्योगांमध्ये अभ्यासक्रम. वेस्टर्न ऑस्ट्रेलिया युनिव्हर्सिटी STEM अभ्यासक्रम, जागतिक रँकिंगमध्ये अग्रस्थानी. इलिनॉय टेक (USA) भारतात कॅम्पस उभारणारे पहिले अमेरिकन विद्यापीठ IED (इटली) फॅशन, डिझाईन, व्हिज्युअल कम्युनिकेशनमध्ये प्रशिक्षण. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले की, अजूनही अनेक आंतरराष्ट्रीय विद्यापीठे भारतात येण्यासाठी इच्छुक आहेत. विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आता उंच भरारी मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# वनहक्क: एका दिवसात १,००० अर्ज निकाली

## सहा तालुक्यांत विशेष शिबिरे



**सहा तालुक्यांतून किती होते प्रलंबित दावे?**

| तालुका | वैयक्तिक | सामुदायिक | एकूण |
|---|---|---|---|
| सत्तरी | २,६२० | १६ | २,६३६ |
| फोंडा | २५५ | २ | २५७ |
| केपे | १,६१२ | १४ | १,६२६ |
| सांगे | १,०८२ | १५८ | १,२४० |
| धारबांदोडा | १,७०४ | ७३ | १,७७७ |
| काणकोण | २,३९९ | १०५ | २,५०४ |

**पणजी । प्रतिनिधी**

राज्यातील प्रलंबित वनहक्क दावे येत्या १९ डिसेंबर २०२५ पर्यंत निकाली काढण्याची हमी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिल्यानंतर, प्रशासनाने तातडीने कारवाईस प्रारंभ केला आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी उत्तर गोव्यातील सत्तरी आणि दक्षिण गोव्यातील फोंडा, धारबांदोडा, सांगे, केपे आणि काणकोण या सहा तालुक्यांत विशेष शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमधून सुमारे १,००० अर्ज निकाली काढण्यात आले, व त्यासंदर्भातील पुढील प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. राज्यात वनहक्क कायदा २००६ नुसार दावे करण्याची प्रक्रिया २०१२ मध्ये सुरू झाली होती. मात्र, २०१९ पर्यंत फक्त १०० अर्जांचा निपटारा झाला होता आणि २०२१ पर्यंत केवळ ४६ अर्जदारांना सनद देण्यात आली होती. मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून डॉ. सावंत यांनी या प्रक्रियेला गती दिली असून, अलीकडेच घेतलेल्या बैठकीत जिल्हाधिकारी, महसूल, आदिवासी कल्याण खात्यांसह संबंधित अधिकाऱ्यांना विशेष शिबिरे घेण्याचे निर्देश दिले होते. सत्तरी तालुक्यातील १,५७९ प्रलंबित अर्जांपैकी ५५३ अर्जांना यापूर्वी मंजुरी मिळालेली आहे, तर या शिबिरात ११० अर्जांची प्रक्रिया हाती घेण्यात आली. फोंडा उपजिल्हाधिकारी कार्यालयात १३० अर्जांवरील प्रक्रिया सुरू करण्यात आली. धारबांदोडा येथे यापूर्वी ९०० सनदी देण्यात आल्या होत्या. सध्या ८०० प्रलंबित अर्जांपैकी १०० अर्जांची प्रक्रिया सुरू झाली आहे. केपे येथे ९७ अर्जांवरील कार्यवाही सुरू करण्यात आली. काणकोण येथे सुमारे ४१० अर्जांवर पुढील प्रक्रिया सुरू झाली. सांगे तालुक्यात ५२ अर्ज निकाली काढण्यात आले. वनहक्क दाव्यांची निकाली प्रक्रिया ही 'प्रोजेक्ट अधिकार' या सरकारी उपक्रमाचा भाग असून, डिसेंबर २०२५ पूर्वी सर्व पात्र अर्ज निकाली काढण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. शिबिरांत उपजिल्हाधिकाऱ्यांनी अर्जदारांना १५ दिवसांत आवश्यक कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन केले आहे. अर्जांची प्रथम छाननी केल्यानंतर आवश्यक सुधारणा केल्या जातील. त्यानंतर ग्रामसभा मंजुरीनंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अंतिम निर्णयासाठी अर्ज पाठवले जातील. प्रलंबित व मंजूर प्रकरणांबाबत निर्णय घेण्यासाठी येत्या २१ जून रोजी विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात येणार आहेत. त्याआधी १८ जून रोजी उपजिल्हाधिकारी स्तरावर निकाली प्रकरणांसाठी बैठका होणार आहेत.

# बेळगाव मिडिया असोसिएशन बैठकीत सीमाभागातील मराठी पत्रकारांच्या मागण्यांसंदर्भात ठराव

## पत्रकार सुरक्षा कायदा लागू करण्याची मागणी

**बेळगाव । प्रतिनिधी**

बेळगाव मिडिया असोसिएशनची बैठक शनिवार, ता. १४ जून रोजी श्री शंभू जत्तीमठ येथे पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी श्रीकांत काकतीकर होते. बैठकीच्या प्रारंभी संघटनेच्या सदस्या अरुणा गोजे-पाटील यांचे सासरे प्रभाकर नारायण गोजे पाटील तसेच अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेत मरण पावलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करत स्तब्धता पाळण्यात आली. या बैठकीत बेळगाव सीमाभागातील मराठी पत्रकारांचे प्रश्न, सरकारी योजना, सुविधा आणि अधिस्वीकृती यांसंदर्भात सखोल चर्चा झाली.

मराठी पत्रकार महाराष्ट्र व कर्नाटक सरकारच्या विविध योजना व सुविधांपासून वंचित राहत असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. गेल्या ६ वर्षांपासून दोन्ही राज्य सरकारांकडे पत्रकारांना हक्काचे अधिकार मिळावेत यासाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील असल्याचे नमूद करण्यात आले. महाराष्ट्र सरकारने



नुकतेच डिजिटल मिडियासाठी धोरण जाहीर केले असून लवकरच पत्रकारांना त्याचा लाभ मिळणार आहे. या धोरणाचा लाभ बेळगाव सीमाभागातील पत्रकारांनाही मिळावा यासाठी महाराष्ट्र सरकारबरोबरच कर्नाटक सरकारकडेही रीतसर पाठपुरावा करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. बैठकीत खालील मागण्यांवर एकमताने ठराव संमत करण्यात आले: सीमाभागातील पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांना आरोग्य सुविधा मिळाव्यात. पत्रकार सुरक्षा कायदा लागू करावा. पत्रकारांना मोफत बस पास उपलब्ध करावेत. ६० वर्षांवरील पत्रकारांना निवृत्ती वेतन लागू करावे.

डिजिटल मिडियाला सरकारी जाहिराती मिळाव्यात. सीमाभागातील डिजिटल पत्रकारांना अधिस्वीकृती कार्ड देण्यात यावेत. पत्रकारांच्या आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी निधी संकलन करण्याचा निर्णय. पुढील काळात भारती श्रमजीवी पत्रकार संघ (दिल्ली), मराठी पत्रकार परिषद (मुंबई) आणि अ. भा. मराठी पत्रकार डिजिटल मिडिया यांच्याशी संलग्न राहून ध्येयधोरणानुसार कार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. संघटनेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सदस्यांवर तात्काळ कारवाई करण्याचाही ठराव झाला. या बैठकीस उपेंद्र बाजीकर, शेखर पाटील, रवी मालशेट, रवी जाधव, सुहास हुद्दार, अमृत बिर्जे, महादेव पवार, रोहन पाटील, संजय चौगुले, वरुण कारखानीस आणि अविनाश सुतार आदी मान्यवर उपस्थित होते.

# एसटी पास थेट तुमच्या शाळेत राज्य परिवहन महामंडळाची विशेष मोहिम

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यभरातील लाखो विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी एसटी महामंडळाने एक अभिनव उपक्रम हाती घेतला असून, 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' ही विशेष मोहीम ता. १६ जून २०२५ पासून राज्यात सुरू करण्यात येत आहे. याअंतर्गत एसटीचे प्रवास पास थेट संबंधित शाळा वा महाविद्यालयांमध्ये वितरित करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले, ''नवीन शैक्षणिक वर्षाचे पहिले सत्र १६ जूनपासून सुरू होत आहे. घर ते शाळा प्रवासासाठी शासनाने विद्यार्थ्यांना ६६.६६% सवलतीचे पास देण्याची योजना सुरु केली आहे. त्यामुळे केवळ ३३.३३% रक्कम भरून मासिक पास मिळवता येतो.'' शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजना' अंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना एसटीचा मोफत पास मिळतो. यापूर्वी विद्यार्थ्यांना पास मिळवण्यासाठी एसटी आगारात जाऊन रांगेत उभे राहावे लागत होते. काही वेळा गटाने आगारात जाऊन पास मिळवावे लागत होते. यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वेळ वाया जात असे. या नवीन उपक्रमाअंतर्गत, विद्यार्थ्यांच्या शाळा वा महाविद्यालयांनी दिलेल्या



यादीच्या आधारे एसटी महामंडळाचे कर्मचारी त्यांचे पास थेट शाळांमध्ये वितरित करणार आहेत. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना रांगेत उभं राहण्याची गरज राहणार नाही आणि त्यांच्या शैक्षणिक वेळेची बचत होणार आहे. योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी एसटी आगार व्यवस्थापकांनी सर्व शाळा व महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांना पत्र पाठवून विद्यार्थ्यांच्या आवश्यकतेनुसार पास यादी तयार ठेवण्याची सूचना केली आहे. राज्यभरातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना या उपक्रमाचा मोठ्या प्रमाणावर थेट लाभ होणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.




# रेणुका माता देवस्थान जुन्या ट्रस्टच्या ताब्यात; उच्च न्यायालय आदेशानंतर मंदिर परिसरात जल्लोष

## पेढे वाटून व फटाक्यांची आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नागापूर (एमआयडीसी) येथील रेणुका माता देवस्थान अखेर जुन्या ट्रस्टच्याच ताब्यात राहणार असल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे. याआधी पुणे धर्मदाय आयुक्त यांनीही जुन्या ट्रस्टला मान्यता दिली होती. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर मंदिर परिसरात ट्रस्टचे पदाधिकारी, विश्वस्त आणि ग्रामस्थांनी जल्लोष साजरा केला. मंदिरात आरती करत प्रारंभ झाला आणि नंतर एकमेकांना पेढे भरवून, फटाक्यांची आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त गोरख कातोरे, राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर यांच्यासह ह.भ.प. राधाकिसन कातोरे, गंगाधर वाकळे, नगरसेवक दत्तापाटील सप्रे, नवनागापूर ग्रामपंचायत सदस्य नाना दांगट, ज्ञानदेव सप्रे यांच्यासह अनेक भाविक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सन २००२ मध्ये रेणुका माता देवस्थान ट्रस्टची स्थापना करण्यात आली होती. मात्र २०१९ साली काही संचालकांनी बंडखोरी करून नवीन ट्रस्ट स्थापन केला. यामुळे जुना व नवीन ट्रस्ट यांच्यात वाद निर्माण झाला.या संदर्भात अध्यक्ष प्रभाकर भोर व सचिव दत्तात्रय विटेकर यांनी पुणे धर्मदाय आयुक्त कार्यालयात दावा दाखल केला होता. तीन वर्षांच्या सुनावणीअंती ता. २४ मार्च २०२३ रोजी धर्मदाय आयुक्तांनी जुन्या ट्रस्टला मान्यता देत नवीन ट्रस्टची मान्यता रद्द केली होती. धर्मदाय आयुक्तांच्या निर्णयाविरोधात नवीन ट्रस्टने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अपील केले होते. मात्र न्यायाधीश किशोर सी. संत यांनी जुन्या ट्रस्टलाच मान्यता देण्याचा अंतिम आदेश दिला. या न्यायालयीन लढ्यात जुन्या ट्रस्टच्या वतीने ॲड. नंदकिशोर गरुड व ॲड. विवेक ढगे यांनी काम पाहिले, तर पुणे येथून ॲड. शिवराज कदम यांनी सहकार्य केले. हा निकाल जुन्या ट्रस्टसाठी एक ऐतिहासिक निर्णय ठरला असून, मंदिराचे पुन्हा एकदा अधिकृत व कायदेशीर व्यवस्थापन पूर्ववत ट्रस्टकडे येणे भाविकांसाठी समाधानकारक ठरले आहे. मंदिराचा धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक समतोल यापुढेही अशाच प्रकारे अबाधित राहील, अशी अपेक्षा भाविकांनी व्यक्त केली आहे.



# कर्तृत्ववान व्यक्तींमुळे नव्या पिढीला प्रेरणा मिळते– ॲड. आगरकर

## पाटील, ॲड. काकडे यांचा श्री विशाल गणेश देवस्थानतर्फे गौरव

**अहमदनगर । प्रतिनिधी**

समाजासाठी भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान म्हणजे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा प्रेरणादायी क्षण असतो. स्नेहल मिलिंद पाटील (विभागीय वन अधिकारीपदी पदोन्नत) आणि ॲड. विजया सुभाष काकडे (व्हा. चेअरमन, अंबिका महिला बँक) यांचा श्री विशाल गणेश देवस्थानतर्फे सन्मान करण्यात आला. या वेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर म्हणाले, ''कर्तृत्ववान व्यक्तींमुळे नव्या पिढीला आदर्श घडतो.स्नेहल पाटील व ॲड. काकडे यांनी आपल्या कार्यातून समाजासमोर आदर्श ठेवला आहे. त्यांच्या या यशामागे मेहनत, निष्ठा आणि सातत्य आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देतो.'' सत्कारप्रसंगी व्हा. चेअरमन पंडितराव खरपुडे, विश्वस्त पांडुरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसौंदर, बापूसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, विजय कोथिंबीरे, संजय चाफे, नितीन पुंड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना पंडितराव खरपुडे म्हणाले, ''श्री विशाल गणेश देवस्थान ही संस्था केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक जबाबदारीही पार पाडते. कर्तव्यनिष्ठ व्यक्तींचा गौरव करणे हे आमचे कर्तव्यच आहे.'' सत्काराला उत्तर देताना स्नेहल पाटील म्हणाल्या, ''हा सन्मान माझ्यासाठी मोठी प्रेरणा ठरेल. पदोन्नती ही केवळ प्रशासकीय बाब नसून माझ्यावर असलेल्या जबाबदारीत वाढ दर्शवते. पर्यावरण रक्षणासह लोकाभिमुख प्रशासनाची भावना जपण्याचा मी प्रयत्न करत आहे. समाजात अशा स्वरूपाचा सन्मान मिळणे, ही मेहनत व निष्ठेला मिळालेली मान्यता आहे.'' ॲड. विजया काकडे म्हणाल्या, ''अंबिका महिला बँकेच्या व्हा. चेअरमनपदी निवड झाल्याने महिलांच्या सक्षमीकरणाच्या कार्यात अधिक समर्पणाने काम करता येणार आहे. श्री विशाल गणेश देवस्थानने दिलेला गौरव केवळ सन्मान नाही, तर सामाजिक बांधिलकीची जाणीव अधोरेखित करणारा क्षण आहे.'' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन पुंड यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय चाफे यांनी केले.

# मोहम्मद रफी शिल्पासाठी शिल्पकार विकास कांबळे यांचा गौरव



**अहमदनगर । आबीद खान**

हिंदी संगीत क्षेत्रातील महान गायक मोहम्मद रफी यांचा हुबेहूब आणि आत्मस्पर्शी पुतळा साकारल्याबद्दल शिल्पकार विकास कांबळे यांचा मखदूम सोसायटी, गाता रहे मेरा दिल ग्रुप आणि स्वरछंद ग्रुप यांच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या सहसचिव व आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शायरा डॉ. कमर सुरुर, उर्जिता फाउंडेशनच्या संध्या मेढे, स्वरछंद ग्रुपचे राजकुमार गुरनानी, हेमंत नरसाळे, विजय माळी, दीपा माळी, गाता रहे मेरा दिल ग्रुपचे ॲड. अमीन धाराणी, ॲड. गुलशन धाराणी, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना डॉ. कमर सुरुर म्हणाल्या, ''विकास कांबळे यांनी केवळ एक चेहरा नाही, तर संपूर्ण व्यक्तिमत्त्व शिल्पातून साकारले आहे. त्यांच्या शिल्पकलेत भावना, आत्मीयता, अभिव्यक्ती यांचा सुंदर संगम जाणवतो. ही कला म्हणजे केवळ कौशल्य नाही, ती एक तपस्या आहे. कांबळे यांनी मोहम्मद रफी यांच्या शिल्पातून त्या तपस्येला अमरत्व दिले आहे.''गाता रहे मेरा दिल ग्रुपचे ॲड. अमीन धाराणी म्हणाले, ''विकास कांबळे यांचं हे शिल्प म्हणजे रफींच्या सुरेल गायकीचं दृश्य रूप आहे. त्यांनी फक्त मूर्ती घडवली नाही, तर त्यामध्ये भावना जिवंत केल्या आहेत.'' या प्रसंगी विविध कलाकार, संगीतप्रेमी, साहित्यिक आणि समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात मोहम्मद रफी यांची अमर गीते सादर करत त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. शिल्पकार कांबळे यांच्या कलाकृतीचे सर्व स्तरांतून भरभरून कौतुक करण्यात आले.

# संस्था स्वभांडवली करण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न निश्चितच स्वागतार्ह– यादव

## पोस्टलची नववी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहमदनगर डिस्ट्रिक्ट नॅशनल पोस्टल को-ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड, अहिल्यानगर या संस्थेची नववी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन नामदेव डेंगळे यांच्या अध्यक्षतेखाली राज पॅलेस कॉन्फरन्स हॉल येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली.



सभेची सुरुवात सभासद वंदना मिलिंद नगरकर यांच्या स्वागतगीताने झाली. संचालक कमलेश मिरगणे यांनी सभेची नोटीस व संस्थेची आर्थिक पत्रके सभेपुढे सादर करत त्यावर सविस्तर माहिती दिली. उपस्थित सभासदांनी सर्व विषय टाळ्यांच्या गजरात एकमताने मंजूर केले. संस्थेचे जेष्ठ सभासद संतोष यादव यांनी आर्थिक पत्रकावर भाष्य करत सांगितले की, संस्थेची स्थापना झाल्यापासून संचालक मंडळाने संस्था स्वभांडवलातच चालवण्याचा संकल्प केला असून, मागील नऊ वर्षांपासून ही धोरणात्मक भूमिका अवलंबली गेली आहे. आजपर्यंत संस्थेने कोणताही कॅश क्रेडिट घेतलेला नसतानाही, मंजूर उपविधिनुसार सभासदांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे. ही बाब अत्यंत उल्लेखनीय असून, संस्थेचा नावलौकिक एक स्वभांडवली संस्था म्हणून निर्माण झाला आहे, असे त्यांनी नमूद केले. या प्रसंगी वाय. पी. साळवे, रामभाऊ लांडगे, शिवकुमार पंचारिया, संतोष यादव यांच्या हस्ते सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गौरव करण्यात आला.

संस्थेचे मार्गदर्शक व विविध मान्यवरांनी संस्थेच्या कारभाराबाबत समाधान व्यक्त करत संचालक मंडळाच्या नियोजनशक्तीचे कौतुक केले. कार्यक्रमात राधाकिसन मोटे, प्रदीप सूर्यवंशी, पी. ए. चौगुले, तान्हाजी सूर्यवंशी, अमोल साळवे, मोनाली हिंगे, आश्विनी चिंतामणी, प्रितम वराडे, अशोक बंडगर, सुनील थोरात, संदीप कोकाटे, प्रकाश कदम, दीपक कुंभारे, तसेच विजय दरंदले, निशा उदमले, सागर पंचारिया, बापू तांबे, सागर बोरुडे, धनंजय दैठणकर, संभाजी बसवेकर, अशोक मोकाशी, दुर्गेश शेटे, दत्तात्रय सुरवसे, आसिफ शेख, नाना रासकर यांच्यासह अनेक सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कमलेश मिरगणे, सूत्रसंचालन तान्हाजी सूर्यवंशी, तर आभारप्रदर्शन अमोल साळवे यांनी केले.

# ढेरंगे यांचे मराठी भाषा संवर्धन आणि वाचन संस्कृती विषयावर ऑनलाईन व्याख्यान

**अहमदनगर । समीर मन्यार**

''वाचावे ते आम्ही'' या बोधवाक्याचे अनुसरण करत साहित्य आणि वाचन संस्कृतीची जोपासना करणारे वाचकपीठ प्रतिष्ठान यंदा आपल्या स्थापनेचा पाचवा वर्धापन दिन साजरा करीत आहे. या निमित्ताने बुधवार, ता. १८ जून २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता सुप्रसिद्ध कवी, लेखक व पत्रकार श्रीकांत ढेरंगे यांच्या ''मराठी भाषा संवर्धन आणि वाचन संस्कृती'' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबतची माहिती वाचकपीठचे अध्यक्ष प्राचार्य चंद्रकांत भोसले आणि प्रसिद्धी प्रमुख शिरीष जाधव यांनी दिली. कोविड काळात साहित्य, नाट्य, कला आणि संस्कृतीसारख्या ज्ञानवर्धनाच्या सर्व दालनांना मर्यादा आल्याच्या पार्श्वभूमीवर, प्राचार्य भोसले, भास्कर निर्मळ पाटील आणि अन्य समविचारी मित्रांनी मिळून जून २०२० मध्ये वाचकपीठची स्थापना केली. या उपक्रमांतर्गत दर महिन्याला एका निवडक काव्यसंग्रहावर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सखोल काव्यचर्चा आयोजित केली जाते. आतापर्यंत एकूण ६१ काव्यचर्चा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडले असून त्यात १७५ हून अधिक साहित्यिक, कवी आणि समीक्षकांनी सहभाग घेतला आहे. या चर्चांमध्ये समाविष्ट झालेल्या अनेक कवितासंग्रहांना राज्य व राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठेची पारितोषिके मिळालेली आहेत. विशेष म्हणजे, काव्यचर्चेसाठी निवडलेला कवितासंग्रह वाचकपीठचे सदस्य स्वतःच्या खर्चाने खरेदी करून त्याचा सखोल अभ्यास करतात आणि त्यावर चर्चा घडवून आणतात, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरते. या वर्धापन दिनाचे औचित्य साधून श्रीकांत ढेरंगे यांचे व्याख्यान वाचकपीठ – आपली कविता या फेसबुक पेजवरून थेट प्रसारित केले जाणार आहे. सर्व रसिक व वाचनप्रेमींनी या विशेष कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन वाचकपीठ प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप; पद्मशाली युवाशक्ती ट्रस्टचा उपक्रम



**अहमदनगर । प्रतिनिधी**

पद्मशाली युवा शक्ती ट्रस्ट आणि पद्मशाली महिला शक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने गरजू ४०० विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. गेल्या नऊ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे. या वेळी ट्रस्टचे सदस्य योगेश म्याकल म्हणाले, ''गरजूंना वह्यांचे वाटप करताना आपण काही मोठं कार्य करत आहोत असे नाही, परंतु त्यांच्या शैक्षणिक वाटचालीत मदतीचा हात देण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.'' कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्री माकैडेय यांच्या महाआरतीने झाली. यावेळी दीपक गुंडू यांनी सांगितले की, ट्रस्टच्या वतीने तोफखाना, दातरंगे मळा, शिवाजी नगर, रंगारगल्ली, चितळे रोड, श्रमिकनगर, पदमानगर, सिव्हील हाडको, शिमला कॉलनी, नागरदेवळे भिंगार, नित्यसेवा आदी भागांतील गरजू विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन वह्यांचे वाटप करण्यात आले. सुमित इप्पलपेल्ली यांनी माहिती दिली की, ट्रस्ट वर्षभरात रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, योग शिबिर, करिअर मार्गदर्शन व्याख्यान, यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार असे अनेक उपक्रम सातत्याने राबवत आहे. या उपक्रमासाठी लक्ष्मण अन्नलदास, अंबादास बिंगी, कट्टा लक्ष्मी, कृष्णा कोडम, करण गांधी, श्रीनिवास येंनगंदुल, प्रवीण कट्टा, शितल झुंजूर, ओम कुरापट्टी, सुभाष वल्लाकटी, डॉ. साईनाथ चिंता, संजय चिप्पा, अमर कोडम, दिगंबर नोमूल, सत्यनारायण गज्जम, संजय वल्लाळ, योगेश येनगुल आदींसह विविध भागांतील ५० हून अधिक देणगीदारांनी आर्थिक मदत करून उपक्रमाला भरीव पाठबळ दिले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी दीपक गुंडू, सुमित इप्पलपेल्ली, योगेश ताटी, सागर बोगा, अजय म्याना, सुरेखा विद्ये, उमा कुरापट्टी, सारिका सिद्यम, निता बल्लाळ, लक्ष्मी म्याना, रेणुका जिंदम, सुनंदा नागुल आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
– संपर्क –
८८८८३४७४११

**निसार Art**
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



**मे. रुपाली एजन्सी**
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर – ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल – rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# श्रीराम मंदिर जागेवर बेकायदेशीर ताब्याचा प्रयत्न

## बापू माने यांचा नंदू ताडे यांच्यावर आरोप

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीराम मंदिराच्या जागेच्या मालकी हक्कावरून वाद उफाळून आला असून, सामाजिक कार्यकर्ते बापू माने यांनी पत्रकार परिषद घेऊन नंदू ताडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. माने यांनी सांगितले की, ''हे मंदिर मूळतः चंद्रनंदन ताडे आणि त्यांच्या वंशजांचे असून नंदू ताडे हे बेकायदेशीररित्या मंदिरावर ताबा मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.'' बापू माने यांनी आरोप केला की, ''नंदू ताडे स्वतःला रामभक्त म्हणवतात, पण प्रत्यक्षात बोकड कापतात. हे रामभक्ताचे लक्षण नाही. खरे रामभक्त आम्ही आहोत. या मंदिराच्या उभारणीत माझे स्वतःचे मोठे योगदान आहे. याशिवाय हनुमान मंदिरही उभारण्याचा मानस असून गरज पडल्यास कर्ज घेण्यासही मी तयार आहे.'' बापू माने यांनी स्पष्ट केले की, नंदू ताडे यांनी दोन परस्परविरोधी प्रतिज्ञापत्रांच्या आधारे मंदिरावर हक्क सांगण्याचा प्रयत्न केला आहे. एका प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, त्यांच्या चुलत बहिणीला वारस नव्हते, त्यामुळे तेच वारस आहेत. दुसऱ्या प्रतिज्ञापत्रात दावा करण्यात आला आहे की, त्यांच्या चुलत्याचे लग्नच झाले नव्हते. ''हे दोन्ही प्रतिज्ञापत्रे परस्परविरोधी आहेत आणि दिशाभूल करणारी आहेत. या प्रकरणी लवकर कारवाई झाली नाही, तर मी शांत बसणार नाही. पुढील सहा महिन्यांत त्यांना जेलची हवा खायला लावीन,'' असा इशारा माने यांनी दिला. माने पुढे म्हणाले, ''श्रीराम मंदिर हे अत्यंत पवित्र स्थान आहे. त्याची जबाबदारी प्रामाणिक व्यक्तीकडेच असली पाहिजे. नंदू ताडे सध्या अनधिकृतरित्या मंदिरावर अतिक्रमण करून बसले आहेत. मंदिराची व्यवस्था मूळ वंशज असलेल्या चंद्रनंदन ताडे व त्यांच्या सहकाऱ्यांकडे यावी, यासाठी कायदेशीर मार्गाने प्रयत्न करणार आहे.'' ''नंदू ताडे यांनी माझ्यावर भूमीमाफिया आणि दहशतवादी वृत्तीचे खोटे आरोप केले. याला कोणताही आधार नाही. मी फुले-शाहू-आंबेडकर चळवळीचा एक साधा कार्यकर्ता आहे. वंचितांच्या कल्याणासाठी काम करत असतो,'' असेही माने यांनी नमूद केले. ''नंदू ताडे यांनी शिवसेना तालुकाध्यक्ष पदाचा वापर करून बनावट दस्तऐवज तयार केले आहेत,'' असा आरोपही त्यांनी केला. या संदर्भात ते मुंबईला जाऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन सविस्तर माहिती देणार असल्याचे माने यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस चंद्रनंदन ताडे, जमुनाबाई ताडे, शिवाजी लक्ष्मीकांत ताडे, लक्ष्मीबाई ताडे, मंजुश्री ताडे, संदीप उमाप, रमेश मखरे, उदय माने, तसेच बी.एम. ग्रुपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**''कोणत्याही नोंदणी कार्यालयात दस्त नोंदवला जातो तेव्हा सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यावरच साक्षीदाराची नोंद होते. त्यामुळे एखाद्या दस्तावर साक्षीदार म्हणून नाव आल्यामुळे मी दोषी ठरत नाही. माझ्यावर खोटे आरोप करून बदनामी केली गेली, याविरोधात मीच नंदू ताडे यांच्यावर कायदेशीर गुन्हा दाखल करणार आहे,'' असे स्पष्ट मत संदीप उमाप यांनी मांडले.**

# वडगावगुप्ता येथे सोयाबीन बियाणे वाटप व बीजप्रक्रिया उपक्रम



**नगरतालुका । समीर मन्यार**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागांतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानातील गळीतधान्य प्रात्यक्षिक प्रकल्पाअंतर्गत भैरवनाथ शेतकरी गट, वडगावगुप्ता यांना महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी केलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांना सोयाबीन बियाणे वाटप, बियाण्याची उगवण क्षमता चाचणी व बीजप्रक्रिया या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक सुनिल दौंड, क्षेत्रीय अधिकारी रविंद्र काळभोर, उप कृषि अधिकारी विजय सोमवंशी (जेऊर), यांची उपस्थिती होती. सुनिल दौंड यांनी महाबीजच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या बियाणे वितरण, बिजोत्पादन व बीजप्रक्रिया कार्यक्रमांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी महा जैविक या जैविक उत्पादनाचा बीजप्रक्रियेसाठी वापर करण्याचे आवाहन शेतकऱ्यांना केले. विजय सोमवंशी यांनी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या गळीतधान्य प्रकल्पाची माहिती दिली तसेच रुंद वरंबा सरी पद्धतीने पेरणी केल्यामुळे होणारे फायदे स्पष्ट केले. रविंद्र काळभोर यांनी खरीप हंगामातील नियोजन, बीज खरेदी करताना घ्यावयाची काळजी, महाबीज बियाण्यांची गुणवत्ता, योग्य पेरणी आणि काढणीपर्यंतच्या सर्व टप्प्यांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. सहाय्यक कृषी अधिकारी नीता गिरी यांनी सोयाबीन बियाण्याची उगवण क्षमता चाचणी प्रत्यक्ष करून दाखवली व त्याचे महत्त्व समजावून सांगितले. सहाय्यक कृषी अधिकारी अभिजीत डुकरे यांनी बीजप्रक्रियेचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन भैरवनाथ शेतकरी गटाचे अध्यक्ष शबापू सातपुते व त्यांच्या टीमने केले. ग्रामपंचायत वडगावगुप्ताचे सरपंच विजयराव शेवाळे यांनी उपस्थित अधिकारी व पाहुण्यांचे स्वागत करताना, अशा उपक्रमांचे गावपातळीवर विशेष महत्त्व असून ग्रामपंचायतीकडून भविष्यातही अशा कार्यक्रमांना पूर्ण सहकार्य मिळेल, असे आश्वासन दिले. या वेळी पाणी फाऊंडेशनचे गोडसे, प्रगतशील शेतकरी प्रल्हाद डोंगरे, रामचंद्र पवार, प्रभाकर शेवाळे, विजय डोंगरे, सिताराम शिंदे तसेच अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उपक्रम जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, उपविभागीय कृषी अधिकारी दत्तात्रय डमाळे, तालुका कृषी अधिकारी विकास पाटील आणि मंडळ कृषी अधिकारी माधवी घोरपडे (जेऊर) यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.



# ज्येष्ठ टेलर व्यावसायिक साहेबराव जैन यांचा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान

**कोपरगाव । किसन पवार**

शहरातील टेलर व्यवसायात दीर्घकाळ निष्ठेने व प्रामाणिकपणे सेवा देणारे साहेबराव शिवराम जैन (ज्येष्ठ जैन टेलर) यांना कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाच्यावतीने नुकताच ''जीवन गौरव पुरस्कार'' प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार ता. २५ मे रोजी कोपरगाव येथे एका शानदार समारंभात प्रदान करण्यात आला. या वेळी आमदार आशुतोष काळे, स. म. कोल्हे साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे, महासंघाचे अध्यक्ष काका कोयटे, समिती सदस्य, व्यापारी बंधू आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. या पुरस्काराच्या निमित्ताने कोपरगावच्या व्यापारी समाजाने आपल्या व्यवसाय क्षेत्रातील एका थोर व आदर्श वृद्ध व्यक्तिमत्त्वाला दिलेला सन्मान हे कौतुकास्पद पाऊल असल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. सन १९६२ पासून ''जैन टेलर'' या नावाने कोपरगाव बाजारपेठेत कार्यरत असलेल्या साहेबराव जैन यांनी टेलरिंग व्यवसायात प्रामाणिकपणा, उत्कृष्ट शिलाई, वेळेची शिस्त आणि ग्राहकांशी सौहार्दपूर्ण व्यवहार यामुळे विशिष्ट स्थान मिळवले आहे. पुरातन पोशाखशैलीपासून ते फिल्मी फॅशनपर्यंत त्यांना असलेली अचूक जाण, डिझाईनमध्ये नजाकत आणि दर्जेदार शिलाईमुळे त्यांचे दुकान फॅशनप्रेमींसाठी एक खास ठिकाण ठरत असे. त्यांनी शर्ट, कोट, बंद गळा आणि पँट यांसारख्या पोशाखांचे अत्यंत सुंदर नमुने तयार करून हजारो ग्राहकांच्या मनात आदर निर्माण केला आहे. आज त्यांच्या पुढील पिढीनेही प्रामाणिक सेवा आणि व्यवसाय मूल्यांचा वारसा जपलेला आहे. व्यवसायासोबतच सामाजिक जाणिवा आणि ग्राहकांशी प्रामाणिक संबंध ठेवणे हीच त्यांची यशस्वीतेची गुरुकिल्ली ठरली.

**''माझ्या जीवनप्रवासाला मिळालेला हा सन्मान म्हणजे माझ्या कष्टांची, जिद्दीची आणि प्रामाणिक सेवाभावाची समाजाने घेतलेली दखल आहे. शिक्षण फक्त पाचवीपर्यंत झाले, पण कधीही हार मानली नाही. ग्राहकांचा विश्वास आणि कुटुंबाची साथ हेच माझं खरं भांडवल ठरलं. हा सन्मान पुढच्या पिढीसाठीही प्रेरणा ठरेल, हीच माझी अपेक्षा आहे,'' असे भावनिक उद्गार साहेबराव जैन यांनी काढले.**

# जिरेवाडीत जलसंधारणाची कामे गेली पूर्णत्वास; मुकुंद आंधळे व नवनाथ आंधळे यांचा पुढाकार



**प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष मुकुंद आंधळे यांनी, सेतू केंद्राच्या माध्यमातून अनेक पुरुष व महिला ग्रामस्थांना शिधापत्रिका, दिव्यांग प्रमाणपत्रे, संजय निराधार योजना व श्रावणबाळ योजनेचे लाभ मिळवून देण्यासाठी मदत केल्याने, त्यांचे नेतृत्व जिरेवाडी गावाने स्विकारले. त्यामुळे, मोठ्या कालखंडानंतर गावात सत्तापरिवर्तन झाले. त्यांच्या कामाकडे, तालुक्यातील राजकीय धुरीणांचे लक्ष वेधले गेल्याने, ते कोरडगाव गणातून पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी प्रबळ दावेदार मानले जातात.**

**पाथर्डी । प्रतिनिधी**

जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून, जिरेवाडी गावात गाळमुक्त धरण व बंधारा खोलीकरणाची कामे पूर्णत्वास गेली आहेत. त्यामुळे पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याची माहिती प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष मुकुंद आंधळे यांनी दिली आहे. मुकुंद आंधळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, जलयुक्त शिवार योजनेंतर्गत झालेल्या बंधारा नंबर एकचे ३५० मीटर खोलीकरण करण्यात आले असल्याने, जिरेवाडी व सोनोशी या दोन्ही गावांतील शेतकऱ्यांना शेतात येजा करण्यासाठी रस्ते तयार करण्यात आले आहेत.

अनेक वर्षांपासून शेतात येण्याजाण्यासाठी रस्ते नसल्याने मोठी अडचण होती. आता रस्त्यांसह पाण्याचा प्रश्न सुटल्यामुळे शेतकऱ्यांनी मुकुंद गर्जे व ग्रामपंचायत सदस्य नवनाथ आंधळे यांच्याप्रती आभार व्यक्त केले आहेत. या बंधाऱ्यांच्या खोलीकरणाच्या कामांसाठी, लोकसहभागही मोठ्या प्रमाणावर होता. त्यामुळे निरुपयोगी माती इतरत्र नेण्यात आर्थिक अडचण आली नाही. याकामी, आमदार मोनिका राजळे, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे अभियंता आनंद रुपनर व नाम फाऊंडेशनचे संग्राम खलाटे यांचे मोठे सहकार्य लाभल्याचे, मुकुंद आंधळे यांनी सांगितले. तसेच, या कामासाठी सरपंच सौ. लक्ष्मीबाई आंधळे, उपसरपंच रंजना कचरे, विष्णू आंधळे, राजेंद्र बडे, प्रकाश आंधळे, अनिल आंधळे,नवनाथ आंधळे, नारायण (नाना)आंधळे व अण्णासाहेब पवळे, यांचेही सहकार्य लाभले.

# नागवडे साखर कारखाना संचालकपदी कातोरे, खरात





**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखाना लि. च्या तज्ञ संचालकपदी उक्कडगाव येथील प्रगतशील शेतकरी व तालुका दूध संघाचे माजी संचालक दत्तात्रय कुंडलिक कातोरे तसेच गार खरातवाडी येथील ज्ञानदेव गना खरात यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ता. ९ जून २०२५ रोजी कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत एकमताने ही निवड करण्यात आली. दत्तात्रय कातोरे व ज्ञानदेव खरात यांनी गेल्या २५ ते ३० वर्षांपासून स्व. शिवाजीराव नागवडे बापू यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी, सहकार, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. दोघेही आदर्श शेती व्यवस्थापन व कुटुंब संस्कृती यासाठी परिचित असून, प्रगतशील शेतकरी म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. या नियुक्तीबद्दल कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे, उपाध्यक्ष बाबासाहेब भोस, सर्व संचालक मंडळ सदस्य, तसेच अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका अनुराधाताई नागवडे यांनी दोघांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# साखर कामगारांच्या वेतनवाढीवर शरद पवारांचा लवाद सर्वमान्य

**नेवासा । विजय खंडागळे**

राज्यातील साखर कामगारांच्या वेतनवाढीबाबत व सेवाशर्तींसह विविध मागण्यांवर तोडगा न निघाल्याने साखर कामगार आणि साखर कारखानदारांनी ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्या लवादाचा निर्णय सर्वमान्य मान्य केला आहे. बैठकीनंतर सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आता याविषयीचा अंतिम निर्णय पवार साहेब देतील व तो दोन्ही पक्षांना बंधनकारक राहणार आहे. ता. १३ जून २०२५ रोजी पुणे साखर संकुल येथे पार पडलेल्या त्रिपक्षीय समितीच्या चौथ्या बैठकीत हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष पी. आर. पाटील होते. या वेळी समितीतील सदस्य, साखर संघाचे माजी अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ, विस्माचे (वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन) अजित चौगुले, तसेच राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, कार्याध्यक्ष राऊ शंकर पाटील, उपाध्यक्ष युवराज रनवरे, कोषाध्यक्ष प्रदीप बनगे, राजेंद्र तावरे, डी. एम. निमसे, अशोकराव पवार, महासंघाचे अध्यक्ष पी. के. मुंडे, सरचिटणीस आनंदराव वायकर, कार्याध्यक्ष शिवाजी औटी, उपाध्यक्ष सत्यवान शिखरे आदी उपस्थित होते. राज्यातील साखर कामगारांसाठी यापूर्वी झालेल्या कराराची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी संपुष्टात आली होती. त्यानंतर नवीन करारासाठी साखर आयुक्त कार्यालयावर भव्य मोर्चा व बेमुदत संपाची हाक देण्यात आली होती. या आंदोलनांनंतर शासनाने तातडीने त्रिपक्षीय समिती गठीत केली. कामगार संघटनांची सध्याच्या वेतनात सुमारे ४० टक्के वाढ ही मुख्य मागणी असून, अन्य सेवा व कल्याणकारी बाबींवरही विस्तृत चर्चा झाली. मात्र, अद्याप अंतिम तोडगा निघाल्याने दोन्ही पक्षांनी शरद पवार यांचे लवाद मान्य करून त्यांच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय साखर कामगारांसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. आता शरद पवार यांच्या हस्ते लवकरच अंतिम लवाद निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# चिंताजनक विमान दुर्घटना

सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडनच्या दिशेने निघालेले बोईंग ७८७ – ८ हे विमान उड्डाणानंतर अवघ्या ३१ सेकंदात मेघानीनगर येथील नागरी वस्तीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह २७५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी घडली. या भीषण अपघाताने सर्वांचेच मन हेलावले. हे विमान बी जे मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर कोसळल्याने त्या हॉटेलमधील ३४ विद्यार्थ्यांचाही दुर्दैवी अंत झाला. या दुर्घटनेनंतर संपूर्ण जगभर हळहळ व्यक्त होत आहे. अर्थात विमान दुर्घटना घडून त्यात निष्पाप प्रवाशांचा बळी गेल्याची ही पहिली घटना नाही याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि त्यात अनेक प्रवाशांचा जीव गेला आहे. गेल्याच वर्षी दक्षिण कोरियामध्ये जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान मुआन विमानतळावर उतरताना भीषण अपघात झाला. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले होते. २०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहरांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता. अहमदाबाद येथे झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाला पण अपघाताचे कारण अद्यापही समजू शकले नाही. सरकारने या विमान अपघाताची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमला आहे. हा चौकशी आयोग या अपघाताची सखोल चौकशी करील त्यामुळे लवकरच या अपघाताचे खरे कारण समोर येईल. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सांगण्यात येते. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवतो. या विमानाचे सारथ्य करणारे वैमानिक आणि सहवैमानिक दोघेही अनुभवी होते. त्यामुळे त्यांच्याकडून चूक झाली असावी असे वाटत नाही अर्थात विमान अपघातात केवळ वैमानिकाचीच चूक असते असे नाही. पक्षी विमानाला धडकून अपघात झाल्याच्याही अनेक घटना घडल्या आहे. ऐनवेळी इंजिनमध्ये बिघाड झाल्याने अपघात होतात. वातावरणात बदल झाल्यानेही अपघात होतात. वातावरणाची दृश्यमानता अचानक कमी होऊन अपघात घडल्याच्याही घटना घडल्या आहेत. वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे. हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजारांहून अधिक लहानमोठे विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे. भारतातही अलीकडे विमानात बिघाड झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. मागील वर्षी दिल्लीवरून बंगळुरुला जाणाऱ्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. वैमानिकाने यशस्वी लँडिंग केल्याने अपघात टळला होता. विमान उड्डाण करत असताना विमानातून ठिणग्या उडत असल्याचे वैमानिकाच्या लक्षात आल्याने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्यावेळी अपघात टळला आणि शेकडो प्रवाशांचा जीव वाचला होता. त्या प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्या विमानाचा अपघात झाला नाही मात्र आपल्या देशात विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमावावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे. काँग्रेस नेते संजय गांधी, माजी केंद्रीय मंत्री माधवराव सिंधिया, लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष आणि तेलगु देसमचे नेते जी एम सी बालयोगी, मेघालयाचे ग्रामीण विकास मंत्री सायप्रियम संगमा, हरियाणाचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश जिंदाल, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोरजी खांडू, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री वाय एस राजशेखर रेड्डी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. त्यात आता विजय रूपाणी यांच्या नावाचीही भर पडली आहे. तीन वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे. केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या स्वप्नांचीच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.





**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# गरजुंना मदत करणे हीच खरी समाजसेवा- ॲड.वाडेकर

**अहमदनगर । विजय मते**

तहानलेल्यांना पाणी, भुकेल्यांना अन्नदान करणे ही आपल्या भारतीय संस्कृतीतील सेवा परंपरा आहे. गरजूंना आवश्यक त्या गोष्टी देणे, हीच खरी समाजसेवा असून, अशा सेवा उपक्रमांद्वारे देणाऱ्याला समाधान आणि घेणाऱ्याला आनंद मिळतो, असे मत मोहटादेवी ट्रस्टचे विश्वस्त ॲड. विक्रम वाडेकर यांनी व्यक्त केले.

सावेडी उपनगरातील विनायकराज प्रतिष्ठान गेल्या अनेक वर्षांपासून विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत असून, हा एक स्तुत्य कार्यप्रकल्प आहे. प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विनय वाखुरे यांनी आपला वाढदिवस साधेपणाने साजरा करत समाजासाठी आरोग्य व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले.या उपक्रमांतर्गत सावेडीतील तपोवन रोडवरील बालघर प्रकल्पातील मुला-मुलींना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. शिबिरामध्ये रक्त तपासणी, नेत्र तपासणी आणि मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया नोंदणी अशा सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. प्रभागातील सुमारे ७५० नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.



ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. याशिवाय युवा महाराष्ट्र मित्र मंडळाच्या वतीने गोशाळेत चारा वाटप करण्यात आले.

तसेच बालघर प्रकल्पातील मुला-मुलींची आरोग्य तपासणी करून त्यांना खाऊ आणि वह्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला ॲड. विक्रम वाडेकर, विपुल वाखुरे, अजय रासकर, अतुल देव्हारे, सागर ठाकूर, अनिल लगड, प्रदीप वाखुरे, पांडुरंग कोलते, आदित्य आढाव, प्रणव गांधी, अथर्व शेलार, अंकित धोत्रे, सिद्धार्थ सारडा, पवण पारिख, राज दळवी, विकास राऊत, किरण पंधाडे, सचिन कलंके, मयूर कुलकर्णी, महेश डोखे, सार्थक लोहार, अमित आव्हाड, कुणाल लाटे, अमोल खंडागळे, पार्थ दळवी, रुपेश कपिले, संग्राम केदार, निखिल कोल्हारे यांच्यासह प्रतिष्ठानचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# जाती-धर्माच्या भिंतींविरोधात माणुसकीचा पूल कम्युनिस्ट पक्ष बांधतोय - कॉ. डॉ. राम बाहेती

## शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी | नवीन कामगार संहिता रद्द

## अल्पसंख्यांकांवरील दहशतीला पायबंदीचा त्रैवार्षिक अधिवेशनात ठराव

**अहमदनगर । प्रतिनिधी**

माणसे एकत्र राहून सत्तेविरोधात बंड करू नये, यासाठी सत्ताधारी भाजप सरकार जाती-धर्माच्या भिंती निर्माण करत आहे. मात्र श्रमिक, माणसाला माणूस म्हणून जोडणारा पूल बांधण्याचे काम कम्युनिस्ट करत आहे. जाती-जातीत व धर्मा-धर्मात भांडणे लावून एकमेकांना तोडण्याचे काम सुरु असून, जनतेला श्रमिक, कष्टकरी या एका झेंड्याखाली आणण्याचे कार्य लाल बावट्याची चळवळ करत आहे. जाती-धर्माच्या भिंती उभ्या राहत नाही, तोपर्यंत त्यांचे राजकारण पुढे जाणार नाही. सर्वसामान्यांनी हे राजकारण समजावून घेऊन माणसाला माणसांशी जोडणारा पूल मजबूत करण्याचे आवाहन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव कॉ.डॉ. राम बाहेती यांनी केले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे त्रैवार्षिक जिल्हा अधिवेशन शहरातील कोहिनूर मंगल कार्यालयात उत्साहात पार पडले. यावेळी बाहेती बोलत होते. यावेळी भाकपचे राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशाप्रसंगी भारतीय महिला फेडरेशनच्या राज्य अध्यक्ष कॉ.स्मिता पानसरे, आप्पासाहेब वाबळे, कॉ. बाबा आरगडे, कॉ. बबनराव सालके, जिल्हा सचिव कॉ. ॲड. बन्सी सातपुते, जिल्हा सहसचिव कॉ.सुधीर टोकेकर, संतोष खोडदे, कॉ. भारती न्यालपेल्ली, ज्ञानेश्वर सहाणे, कॉ. महेबुब सय्यद, कॉ. अनंत लोखंडे, अशोक सब्बन, कॉ. कारभारी उगले, कॉ. भगवान गायकवाड, ॲड. ज्ञानदेव सहाणे, कॉ. सुभाष ठुबे आदींसह व पदाधिकारी व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून २५० प्रतिनीधी सहभागी झाले होते. पुढे बाहेती म्हणाले की, सत्ताधारी भाजप एक नंबरचा शत्रुपक्ष म्हणून कम्युनिस्ट व लालबावटाकडे पाहत आहे. तत्त्वांशी तडजोड न करणारे कॉम्रेड त्यांच्या गळाला लागत नाही. त्यांना कसेही वळवता येत नाही यासाठी त्यांच्यासाठी कम्युनिस्ट शत्रू ठरत आहे. देशातील कामगार, कष्टकरी, शेतकरी सर्व समाज घटक त्रस्त आहेत. त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याऐवजी जाती-धर्मावरून राजकारण केले जात आहे. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन सर्वसामान्य, श्रमिकांचे प्रश्न सोडविण्याचे काम कम्युनिस्ट पक्ष करत आहे. कम्युनिस्ट यांनी आजपर्यंत केलेल्या अनेक आंदोलनातून सर्वात जास्त लाभ हिंदू समाजाला झाला, मात्र कम्युनिस्टांनी कधीही हिंदुत्वाचे नाव पुढे केले नाही. गोरगरिबांच्या नावाने आपला संघर्ष सुरु ठेवला. संविधान बदलून हिंदू राष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ४०० पार च्या घोषणा लोकसभेच्या निवडणुकीत देण्यात आल्या असल्याचा आरोप त्यांनी केला. १९७८ साली व नंतर पुन्हा संघर्ष करून १९९१ पर्यंतचे सर्व अतिक्रमणे नियमाकुल करण्याचा शासन निर्णय सरकारला काढावा लागला. कम्युनिस्टांनी लढले तर मिळते! हे दाखवून दिले. २०२५ पर्यंतचे सर्व अतिक्रमणे नियमित करा, ही कम्युनिस्ट पक्षाची मागणी आहे. शेतकरी, शेतमजूर यांचे प्रश्न तीव्र झाले आहे. महिलांवरील अत्याचार वाढले. अल्पसंख्यांक, दलित समाजाला टार्गेट केले जात आहे. त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन हिसकावले जात आहे. भांडवलदारांच्या शाळा चालण्यासाठी सरकारी शाळा बंद पाडण्याचे षडयंत्र सुरू आहे. सर्वसामान्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे कारस्थान आहे. या सर्व घटकांवर होणाऱ्या हल्लेच्या विरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्ष निर्भीडपणे आवाज उठवत असल्याचेही बाहेती म्हणाले. तर जनता सुरक्षा विधेयक ब्रिटिश सरकारची पुनरावृत्ती असून, ज्याला भगतसिंग यांनी विरोध केला होता. तो कायदा सरकार विरोधात असलेल्या आंदोलन, चळवळीला दडपण्याचे काम करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अधिवेशनाच्या प्रारंभी पक्षाचा लाल ध्वज फडकावून त्याला सलामी देण्यात आली. या अधिवेशनात शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी द्यावी, नवीन कामगार संहिता रद्द करावा, शेतीमालाला किमान आधारभूत किंमत मिळण्यासाठी कायदा करावा, अल्पसंख्यांक समाजावर उघडपणे सुरु असलेली दहशतीला पायबंद घालावा, मॉबलिंचिगच्या प्रकरणात आरोपींना कठोर शिक्षा मिळावी, या मागण्या संदर्भात ठराव घेण्यात आला. लाल बावटे की जय... , लाल झेंडे की जय... लाल सलाम! च्या घोषणांनी सभागृह दणणाले. प्रास्ताविकात बन्सी सातपुते यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर रस्त्यावरची लढाई कम्युनिस्ट पक्ष करत आहे. मागील तीन वर्षात कोठे होते व पुढील तीन वर्षात कुठे मार्गक्रमण करायचे? याचा आढावा व नियोजन वैचारिक पक्ष परिषदेत होत असल्याचे त्यांनी सांगितले. अशोक सब्बन यांनी शेतकरी संरक्षण कायदा आणावा व परदेशात शेतकरी यांना विविध कायद्याच्या माध्यमातून देण्यात आलेल्या संरक्षणाची माहिती दिली. कॉ. ॲड. सुभाष लांडे म्हणाले की, सत्ताधारी स्वतःचे हित साधण्यासाठी जाती-जाती व धर्मावरून झुंजवण्याचे काम करत आहे. निवडणुकीत दिलेल्या आश्वासन पूर्ण करण्याऐवजी जाती-धर्माचे मुद्दे उपस्थित करुन प्रमुख प्रश्नांना बगल दिली जात आहे. जन सुरक्षा विधेयक हे अर्बन नक्षलच्या नावाखाली चळवळी दडपण्याचे षडयंत्र असल्याचे त्यांनी सांगितले. कॉ. अनंत लोखंडे यांनी जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन पोटाचे प्रश्न मांडावे लागतील, तेव्हा या धर्मांध शक्तीचे पतन होणार असल्याचे सांगितले. कॉ. महेबुब सय्यद यांनी कम्युनिस्ट यांनी स्वातंत्र्य लढ्यात देशासाठी मोठे बलिदान दिले. आज सत्ताधारी देश प्रेमाचा खोटा बुरखा पांघरला आहे. सर्व माणसांचे रक्त लाल असते, त्याला कोणताही भगवा, हिरवा, निळा रंग नसतो, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शर्मिला गोसावी यांनी केले. आभार संतोष खोडदे यांनी मानले.






# हरीनामाच्या गजरात वडगावचे वारकरी आषाढी वारीसाठी मार्गस्थ

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने लाखो वारकरी आषाढी वारीसाठी सज्ज झाले आहेत. बेळगाव व परिसरातूनही हजारो वारकरी यंदा पंढरपूरला प्रस्थान करत असून आज रविवार, ता. १५ जून रोजी, वडगाव राजवाडा कंपाउंड येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातून शेकडो हरीभक्त आळंदीमार्गे पंढरपूर वारीसाठी हरिनामाच्या गजरात मार्गस्थ झाले. या वर्षी आषाढी वारीसाठी खालील सात प्रमुख पालख्या पंढरपूरकडे प्रस्थान करत आहेत: श्री संत एकनाथ महाराज संस्थान, पैठण, श्री संत निवृत्तीनाथ महाराज संस्थान, त्र्यंबकेश्वर, श्री चांगावटेश्वर देवस्थान, सासवड, श्री संत सोपानदेव महाराज संस्थान, सासवड, श्री संत मुक्ताबाई संस्थान, मुक्ताईनगर, श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कोंडण्यपूर, श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी, श्री संत नामदेव महाराज संस्थान, पंढरपूर, श्री संत निळोबाराय संस्थान, पिंपळनेर. वडगाव श्री संत ज्ञानेश्वर वारकरी मंडळ गेल्या २६ वर्षांपासून आषाढी वारीत पायी सहभागी होत आहे. यावर्षीही मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने पंढरीच्या वारीत सहभागी होण्यासाठी लोकांमध्ये प्रचंड उत्सुकता होती. ता. १८ जून रोजी देहूतून तुकाराम महाराजांच्या पालखीचे आणि ता. १९ जून रोजी आळंदीहून ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे प्रस्थान होणार आहे. या पार्श्वभूमीवर बेळगाव परिसरातील वारकरी वेगवेगळ्या ठिकाणांहून पायी वारीसाठी मार्गस्थ होत आहेत. आज सकाळी श्री संत ज्ञानेश्वर मंदिरात पूजा व आरती करून वारकऱ्यांनी वारीचा शुभारंभ केला. वडगावची ग्रामदेवता श्री मंगाई देवीचे पूजन करून वारीचे धार्मिक वातावरण भक्तिमय झाले. हभप शशिकांत धामणेकर व हभप मंगेश नागोजी चे यांच्या मार्गदर्शनाखाली ६० हून अधिक वारकरी बेळगावहून पंढरपूर मार्गे आळंदी कडे रवाना झाले. हे वारकरी आळंदी येथे ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी समवेत मुक्काम करून, नंतर पंढरपूरकडे पायी वारीने प्रस्थान करणार आहेत.

# ४० वी सेट परीक्षा शांततेत पार; १.१० लाख विद्यार्थ्यांचा सहभाग



**पुणे । पंकज गुंदेचा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सेट परीक्षा विभाग हा महाराष्ट्र शासनाची नोडल एजन्सी तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महाराष्ट्र व गोवा राज्यातील विद्यापीठ आणि वरिष्ठ महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक पदाची पात्रता परीक्षा घेण्याकरिता प्राधिकृत विभाग आहे. आजपर्यंत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सेट परीक्षा विभागाने ३९ सेट परीक्षांचे सुरळीत व पारदर्शकपणे आयोजन केलेले आहेत. एकाही परीक्षेत गैरप्रकार झाला नसण्याचा विद्यापीठाचा इतिहास आहे. विद्यापीठातर्फे परीक्षेबाबत अत्यंत गोपनीयता बाळगली जाते. रविवार ता. १५ जून २०२५ रोजी ४० व्या सेट परीक्षेचे आयोजन सेट परीक्षा विभागामार्फत महाराष्ट्र व गोवा राज्यातील विद्यार्थ्यांकरिता मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक, जळगाव, औरंगाबाद, नांदेड, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, रत्नागिरी, परभणी, नंदुरबार आणि गोवा अशा एकूण १८ शहरांमधील २५६ महाविद्यालयातील ४६०९ वर्ग खोल्यांमध्ये पारंपारिक पद्धतीने करण्यात आले होते. या परीक्षेत दोन पेपर मध्ये बहुपर्यायी स्वरूपाचे प्रश्न विचारण्यात येत असून पहिला पेपर सकाळी १० ते ११ दरम्यान घेण्यात आला व दुसरा पेपर सकाळी ११.३० ते दुपारी ०१.३० दरम्यान घेण्यात आला. दिनांक ५ जून २०२५ पासून विद्यार्थ्यांना प्रवेश पत्रे उपलब्ध करून देण्यात आली होती. सदर परीक्षेसाठी १,१०,४१२ विद्यार्थ्यांनी कला, विज्ञान, वाणिज्य, सामाजिक शास्त्र, विधी, व्यवस्थापन शिक्षण आणि शारीरिक शिक्षण अशा विविध शाखांमधील एकूण ३२ विषयांसाठी अर्ज भरले होते त्यापैकी ९०,४४६ म्हणजेच ८२ टक्के विद्यार्थी परीक्षेत उपस्थित होते. सर्व शहरातील २५६ परीक्षा केंद्रांवर परीक्षा अत्यंत सुरळीतपणे व पारदर्शकपणे पार पडली.